bluebytes
news that matters

लोकमत

Thursday, January 14, 2010

**Social organisation come ahead to control employees smoking**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Supplement: Hello, Journalist: Bureau, Page No: 2, Location: Bottom-Left, Width(cms): 21, Height(cms): 10, Size(sq.cms): 210

# कर्मचाऱ्यांचे धूम्रपान रोखण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचा पुढाकार

मुंबई, दि. १३ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रात धूम्रपानाचे प्रमाण पुरुषांमध्ये १३.३ टक्के तर महिलांमध्ये ०.२ टक्के इतके आहे. यापैकी बहुतांश लोकांना त्यांच्या कामाच्या ठिकाणी धूम्रपानाची सवय लागत असल्याचे एका सर्वेक्षणात आढळून आले आहे. कामाचा ताण आणि वरिष्ठांकडून आणला जाणारा दबाव हे धूम्रपानाच्या आहारी जाण्यामागील प्रमुख कारण असल्याचे समोर आले आहे.

त्यामुळे हिलिस सेखसरिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ या संस्थेने डॅना फार्बर कॅन्सर इन्स्टिट्यूट आणि हॉवर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थ यांच्या सहयोगाने मुंबईतील कर्मचारी वर्गातील धूम्रपानाबाबत एक अभ्यास योजना आखली आहे. या योजनेतून मिळालेल्या माहितीच्या आधारे कर्मचाऱ्यांमध्ये तंबाखूचा वापर कमी करण्यासाठी नियोजनबद्ध कार्यक्रमही आखण्यात येणार आहे.

हेलिस सेखसरिया इन्स्टिट्यूटचे संचालक डॉ. प्रकाश गुप्ता यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या वेळी टाटा मेमोरिअल रुग्णालयाचे डॉ. सुरेंद्र शास्त्री, हॉवर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या प्रा. ग्लोरियन सोरेनसेन आणि इंडियन असोसिएशन ऑफ ऑक्युपेशनल हेल्थचे अध्यक्ष डॉ. श्याम पिंगळे उपस्थित होते.



## तंबाखू नियंत्रणावर अभ्यास योजना राबविणार

कामाच्या ठिकाणी होत असलेल्या धूम्रपानाला आळा घालण्यासाठी अमेरिकेत काही प्रयोग करण्यात आले. कामाच्या ठिकाणांमधील अंतर्गत वातावरण बदलण्याचा व्यवस्थापनाने प्रयत्न केला तेव्हा त्याचा चांगला परिणाम दिसून आला. कामगारांना धूम्रपान सोडण्याबाबत मार्गदर्शन करणे, काम करताना उद्‌भवणारे धोके कमी करणे, मनावरील ताण कमी करणे अशा बाबतीत व्यवस्थापनाने योग्य त्या सुधारणा केल्यास कामगारांमधील धूम्रपानाचे प्रमाण कमी होऊ शकते, असे स्पष्ट झाले आहे. या संशोधनाचा उपयोग भारतातही करता येऊ शकतो. यामुळे कामाच्या ठिकाणी धूम्रपानावर नियंत्रण आणून धूम्रपानमुक्त वातावरण निर्माण करता येऊ शकेल, असे डॉ. गुप्ता यांनी सांगितले.

तर धूम्रपानावर नियंत्रण आणल्यास धूम्रपानामुळे होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांना आळा बसू शकेल. त्यामुळे कामगारांच्या वैद्यकीय खर्चात कपात होईल आणि कामगारांची गैरहजेरीही कमी होईल. त्यामुळे त्यांच्या उत्पादनक्षमतेत वाढ होऊन त्याचा फायदा अर्थातच उद्योगांना होईल, असे हॉवर्ड स्कूल ऑफ पब्लिक हेल्थच्या प्रा. ग्लोरियन सोरेनसेन यांनी सांगितले.

ही अभ्यास योजना पाच वर्षांसाठी असून या योजनेद्वारे मुंबईतील २४ कंपन्यांमधील सुमारे १ लाख ५ हजार कामगारांना धूम्रपानाचे आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या दुष्परिणामांची माहिती देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच २००० साली विकसित आणि विकसनशील देशांमध्ये तंबाखूमुळे मृत्यू झालेल्यांची संख्या प्रत्येकी दोन लाख होती. मात्र २०३० सालापर्यंत विकसित देशांमध्ये ३ लाख लोक तर विकसनशील देशांमध्ये ७ लाख लोक तंबाखूच्या सेवनामुळे दगावू शकतात, अशी धक्कादायक माहिती जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालातून समोर आल्याचे सोरेनसेन यांनी सांगितले. त्यामुळे येत्या काळात तंबाखूच्या दुष्परिणामांविषयी लोकांमध्ये अधिकाधिक जागृती करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.